# भारतीय प्रजासत्ताक आणि त्यापुढील आव्हाने

**प्रा.डॉ. रविंद्र भणगे,** राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

प्रजासत्ताक म्हणजे प्रजेची, लोकांची सत्ता असणारी व्यवस्था होय. भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यात भारताचे प्रजासत्ताक राज्य स्थापन करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. प्रजासत्ताक ही अशी राजकीय व्यवस्था आहे की, ज्यामध्ये राज्याच्या प्रमुखाची निवड लोकांकडून केली जाते. राज्याचा कारभार हा जनतेच्या नावानेच म्हणजे जनतेने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष पद्धतीने निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या नावे चालविला जातो. संपूर्ण सत्ता ही जनतेच्या हाती असते. निवडून दिलेल्या प्रतिनिधींना जोपर्यंत जनतेची अधिमान्यता असते तोपर्यंत ते सत्तेवर राहू शकतात. प्रसंगी जनतेने अधिमान्यता काढून घेतल्यानंतर सत्तेवरून पायउतार व्हावे लागते. प्रजासत्ताक राज्य हे वंशपरंपरेने अधिकारावर येणाऱ्या सत्तेला अमान्य करते. राजेशाही आणि हुकुमशाही यापेक्षा वेगळेपणा दर्शविण्यासाठी 'प्रजासत्ताक' हया शब्दाचा शब्दप्रयोग करण्यात आला. प्रजासत्ताक आणि गणराज्य हया दोन्ही संकल्पना परस्पर संबंधित आहेत. जनतेची सत्ता प्रस्थापित होणे म्हणजेच प्रजासत्ताक आणि राष्ट्रप्रमुख हा वंशपरंपरेने सत्तेवर न येता अप्रत्यक्षरित्या जनतेकडून निवडला जातो. यालाच गणराज्य म्हणतात. म्हणजेच प्रजासत्ताक आणि गणराज्य या दोन्ही संकल्पना मतितार्थाने परस्परांशी निगडीतच आहेत.

भारतीय प्रजासत्ताक हे लोकशाही तत्त्वावर आधारलेले आहे. जनतेला आपल्या प्रतिनिधीद्वारे राज्यकारभार करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. त्याचबरोबर स्वातंत्र्य देखिल बहाल केलेली आहेत. नागरिकांना विचारांचे, अभिव्यक्तीचे, श्रद्धा, उपासना यांचे स्वातंत्र्य, सर्वांना समान संधी आणि सामाजिक, आर्थिक, राजकीय न्याय प्रस्थापित करण्याचे योजले आहे. भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेची सुरूवातच 'आम्ही भारताचे लोक' अशी केलेली आहे.

भाषा, धर्म, जात यामध्ये बहुविविधतेचे प्रतिनिधीत्व असणारा हा देश आहे. तरीही कोणत्याही विशिष्ट जात, धर्म, भाषा यांना श्रेष्ठतव न देता जनतेला केंद्रस्थानी ठेवले आहे. देशाचे नागरिक या नात्याने जनतेला विविध हक्क दिलेले आहेत. त्यामुळे प्रजासत्ताक राज्य मजबूत बनेल. भारतीय समाजाचे सिंहावलोकन केले असता असे दृष्टीक्षेपास येते की, भारतीय समाज हा एकसंध नव्हता तर तो जाती, धर्म, भाषा, पंथ, वर्ण इत्यादिमध्ये विभागला होता. वर्षानुवर्ष विषमता, भेदभाव यामध्ये समाज अडकला होता. समाज हा अशिक्षित, अज्ञानी होता. राजकीय हक्कांची जाणीव नव्हती. व्यक्तीच्या हक्कांना कोणतेही स्थान नव्हते. जाती धर्माच्या श्रेष्ठ कनिष्ठतेमध्ये विभागलेल्या समाजामध्ये कोणतेही बंधुत्वतेचे तत्व नव्हते. व्यक्तीची ओळख ही तो ज्या जातीत जन्म घेतला आहे त्यावरून होत असे. त्यामुळे व्यक्तीच्या विकासाला वाव राहिला नाही. जातीवरून व्यवसाय ठरले होते. त्यामुळे श्रेष्ठ कनिष्ठतेची उतरंड निर्माण झाली होती. संपत्तीचे देखील असमान वितरण झाले होते. जाती धर्माच्या विषमतेप्रमाणेच आर्थिक पातळीवर देखील विषमतेची दरी निर्माण झाली होती. तत्कालीन कालखंडात ५६२ संस्थाने प्रस्थापित होती. कायदेनिर्मिती, न्यायदान हे एकाच छताखाली चालत होते. परंतु भारतीय राज्यघटना निर्मिती करताना राजेशाही आणि वंशपरंपरागत सत्तेला नाकारत जनतेला केंद्रस्थानी ठेवून जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्याद्वारे राज्याचा कारभार पाहणारी प्रजासत्ताक पद्धती अवलंबण्यात आली. घटना समितीच्या बैठकीमध्ये 'प्रजासत्ताक' हा शब्द निश्चित करण्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली. मतमतांत्तर होऊन, विरोधी मतांची कदर करून एकमताने प्रजासत्ताक हा शब्द राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेत समाविष्ट केला गेला.

राज्यघटनेद्वारे बहुविविधता कायम असलेल्या देशामध्ये जनतेला सर्वोच्च स्थानी ठेवले आणि त्यांच्या विकासासाठी घटनेमध्ये विविध तरतुदी केल्या गेल्या. मुलभुत अधिकार दिले गेले. व्यक्तीला स्व:ताचा विकास करण्यासाठी आणि स्वातंत्र्य देण्यासाठी मुलभुत अधिकार सुपूर्त केले आहेत. आर्थिक, सामाजिक, राजकीय समानता प्रस्थापित

करण्यासाठी वेळोवेळी पाऊले उचलली आहेत. भेदभावास प्रतिबंध केला. अस्पृश्यता, निवारण्याकरीता तरतुदी केल्या गेल्या. जनता किंवा व्यक्ती हा घटक केंद्रस्थानी ठेवून व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी कल्याणकारी राज्याचे धोरण स्वीकारले गेले. यामधूनच जातविरहीत, धर्मविरहीत लोककल्याणकारी राज्याचा विचार पुढे आला. बदललेल्या परिस्थितीनुसार कालबाहय तत्वांना मागे टाकण्याकरीता प्रसंगी घटनादुरूस्ती केल्या गेल्या. एकंदरीत प्रजासत्ताक राज्य अधिक दृढ करण्यासाठी वेळोवेळी प्रयत्न केले गेले.

भारतीय राजकारणाचा विचार करता आजचे प्रजासत्ताक राज्य काहीसे कमकुवत बनले आहे, असे म्हणता येईल, प्रजासत्ताक राज्याने ज्या जनतेकडे राज्यकारभाराची सुत्रे दिलेली आहेत ती जनता विविध समस्यांमध्ये जखडलेली आहे. याला विविध कंगोरे निर्माण झाले आहेत. हे एकप्रकारचे प्रजासत्ताक राज्यासमोर आव्हानच निर्माण झाले आहे.

भारतीय राज्यघटनेने धर्मनिरपेक्षतेच्या तत्वाचा पुरस्कार केला आहे. परंतु समाजामध्ये आज जाती, धर्माच्या शृखंला दृढ होण्यासाठी पुन्हा एकदा नवे संदर्भ निर्माण होत आहेत. पुन्हा एकदा समाज जात धर्माच्या आधारे टोळया—टोळयांमध्ये विभागला जातो आहे. जातीचं राजकारण येवू पाहात आहे. जाती, धर्मावरून समाजात तेढ निर्माण होत आहे. जरी शिक्षण घेतलं असलं तरी जातीचे नवे आयाम पुढे येत आहेत. साधनांचे समान वितरण न झाल्याने आजही श्रीमंत आणि गरीब अशी दरी कायम राहिलेली आहे. आज डिजीटल युगात शहरांच्यालगत जे भकास झोपडपटयांचचं चित्र आहे ते हेच सांगतं की, आर्थिक समानता प्रस्थापित झालेली नाही. समाजातील सर्व वर्गापर्यंत आर्थिक साधनं पोहोचलेली नाहीत. यामधुनच दारिद्रय, कुपोषण, बेरोजगारी यासारख्या अनेक समस्या उद्‌भवल्या आहेत. जिथे राहणीमानाचा दर्जा निकृष्ट आहे, अन्न, पाणी, निवारा, शिक्षण या किमान गरजा पोहोचलेल्या नाहीत, तिथं प्रस्थापित लोकांचा राजकीय सहभाग असण्याची स्वप्नं आपण कशी काय पाहू शकतो. हा मोठा प्रश्न आहे? किंवा हा घटक प्रजासत्ताक राज्य मजबूत करण्यासाठी महत्वाचा आधार कसा बनू शकेल? हा देखिल एक प्रश्न आहे.

भारतात सुमारे ३० टक्के लोक दारिद्रय रेषेच्या खाली राहत आहेत. १० टक्के लोक श्रीमंत आहेत. आणि राहिलेला ६० टक्के हा मध्यमवर्ग जो या दोन्हीमध्ये विभाजित झालेला आहे. श्रीमंत वर्गाकडे पैसा अधिक असल्याने त्यांचे राहणीमान चांगले आहे. पण ज्यांच्याकडे पैसा नाही त्यांचे राहणीमान मात्र खालावलेले आहे. तो त्यांच्या आकांक्षा पूर्ण करू शकत नाही. म्हणून तो व्यवस्थेवर निराश राहतो. यामधूनच नक्षलवादी, दहशतवादी यासारख्या संघटना व्यवस्थेच्या विरोधात उभ्या राहतायेत. हे एक प्रजासत्ताक राज्यासमोरचं मोठं आव्हान आहे. जो वंचित घटक आपल्या मागण्या व्यवस्थेसमोर मांडतो आहे, त्या मागण्यांची पूर्तता झाली नाही की, तो वंचित घटक व्यवस्थेविरोधात बंड करून उठतो आहे. प्रसंगी गैरमार्गाचाही अवलंब करतो आहे.

प्रजासत्ताक राज्यामध्ये ज्या जनतेकडे अधिकार दिलेले आहेत, त्या जनतेने निवडून दिलेले प्रतिनिधी सत्तेचा दुरूपयोग करत आहे. भ्रष्टाचार मोठया प्रमाणात होत आहे. भ्रष्टाचाराने आज आक्राळ—विक्राळ रूप धारण केले आहे. केंद्रापासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासासाठी जे गावपातळीपर्यंत सत्तेचे विकेंद्रीकरण झालेले आहे, तिथपर्यंत हा भ्रष्टाचार पोहचला आहे. निवडणुकीपुरतीच जनता ही 'मतदार राजा' बनलेली आहे. ज्याच्याकडे अधिक संपत्ती, पैसा आहे तिच व्यक्ती निवडणुक लढवू शकते अशी परिस्थिती बनली आहे. निवडणुकांमध्ये मतांसाठी पैशाचे वाटप केले जाते. असहय जनता मात्र अमूल्य मताच्या अधिकाराला काही थोडया पैशाच्या, आश्वासनांच्या अमिषांना भूलून, आपल्या मतांचे मूल्य ठरवू लागले आहेत. जनता ही प्रजासत्ताक राज्याचा आधार आहे तिच जनता योग्य प्रतिनिधी पाठवून प्रजासत्ताक राज्य मजबूत करते. त्या जनतेसमोर वेगवेगळी आव्हाने निर्माण झाली आहेत. श्रीमंत लोकांच्या हाती सत्ता केंद्रीत होवू लागली आहे. निवडणुकीमध्ये भ्रष्टाचार, लाचलुचपत, दहशत इत्यादी अनिष्ट प्रकार दिसून येतात. या सर्वांचा परिणाम राजकीय सहभागावर होवू लागला आहे.

भारताने आधुनिकीकरणाचा मार्ग निवडला यासाठी प्रचंड मोठी धरणे आणि प्रकल्पांची उभारणी केली गेली. परंतु यामधून मोठयाप्रमाणात पर्यावरणाचा ऱ्हास तर झालाच त्याचबरोबर ज्या लोकांचे उदरनिर्वाहाचे साधन म्हणून ते शेती करत होते, त्यांच्याकडून ते हिरावून घेतल्याने त्यांच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन न राहिल्याने तो समाज सर्वच बाबतीत वंचित राहिला आहे. त्यांचे योग्यरितीने विस्थापन होणे गरजेचे होते हा समाज पुन्हा व्यवस्थेच्या विरोधात उभा राहिलेला दिसून येतो. आदिवासींचे देखील अशाच पद्धतीने प्रश्न निर्माण झाले असल्याने त्यांनी व्यवस्थेच्या विरोधात नक्षलवादाचा आधार घेतला आहे. आपल्या मागण्यांसाठी ते सशस्त्र मार्गाचा देखील वापर करत आहेत.

एकंदरीत प्रजासत्ताक राज्य यशस्वी होण्यासाठी जनता ही सजग असली पाहिजे. योग्य व्यक्तीची निवड लोकप्रतिनिधी म्हणून झाली पाहिजे. जे नेतृत्व जनता निवडून देणार आहे, त्या नेतृत्वाचा लोकशाहीवर विश्वास असला पाहिजे. समतेचे तत्व प्रस्थापित केले पाहिजे. लोकांना समान संधी उपलब्ध करून दिली पाहिजे. मतदानाचा अधिकार हा प्रजासत्ताक राज्यातील महत्वाचा अधिकार आहे. या अधिकारामुळे योग्य व्यक्ती सत्तेमध्ये जावू शकते. म्हणूनच जनतेला राजकीय जाणीव असली पाहिजे. यासाठी शिक्षणाचा प्रसार सर्वच पातळयांवर समान झाला पाहिजे. तरच हा प्रवाह मुख्य प्रवाहामध्ये सामील होवून मजबूत प्रजासत्ताक राज्य बनू शकेल. जेव्हा सर्व प्रवाह एकत्र येतील तेव्हाच प्रजासत्ताक राज्याचा उद्‌देश सफल बनेल. केवळ मुठभर लोकच सातत्याने सत्तेमध्ये राहिले तर सर्वसामान्यांचा तिथे विचार होवू शकणार नाही. यासाठी पक्षाभिमान, व्यक्तीनिष्ठा नाहीशी झाली पाहिजे. आणि लोकांची प्रजासत्ताकावर श्रद्धा असली पाहिजे तरच प्रजासत्ताक राज्य हे यशस्वी बनू शकेल.

**संदर्भ**


१) कश्यप सुभाष, आपली संसद, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, नवी दिल्ली, २००८.

२) शौरी अरूण, द पार्लमेंटरी सिस्टीम, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, २०१२.

३) भोळे भा.ल., भारताचे स्वातंत्र्य पन्नास वर्षाचा मागोवा, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २०१२.

४) गोडबोल माधव, भारताच्या संसदीय लोकशाहीची अग्निपरीक्षा, राजहंस प्रकाशन, पुणे, २०१२.

५) भारताचे संविधान – संचालक मुद्रण व लेखन सामग्री, महाराष्ट्र राज्य मुंबई, भारत सरकार.

६) सिन्हा सच्चिदानंद, लोकतंत्र की चुनौतियॉ, वाणी प्रकाशन, नई दिल्ली, २००५.

७) सिंहल एस.सी., भारतीय शासन एवं राजनीति, लक्ष्मी नारायण अग्रवाल, आगरा, २००७.

८) ओमन टी.के., भारतीय समाजातील समस्या व वाद, अनुवाद – संगिता फाटक, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २०११.